पालक-शिक्षकांची प्रथम कार्यकारी समिती बैठकीची सूचना
कार्यकारी समिती - पी.आय.सी.टी मॉडेल स्कूल
२०२६-२०२७

न.:२६-२७/०१
शाळेचे नाव: पी.आय.सी.टी मॉडेल स्कूल
दिनांक: १० एप्रिल , २०२६

प्रति,
कार्यकारी समितीचे सदस्य

विषय:- कार्यकारी समितीच्या बैठकीबाबत...

प्रिय पालक,

पी.आय.सी.टी मॉडेल स्कूल (२०२६-२०२७) च्या पालक - शिक्षक संघटनेच्या कार्यकारी समितीची पहिली बैठक शनिवार दिनांक २५ एप्रिल, २०२६ रोजी सकाळी ९:०० वा. शाळेच्या आवारात होणार आहे. आपण या बैठकीसाठी स्वत: उपस्थित राहावे ही विनंती.

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क नियमन), नियम, २०१६ च्या नियम ८ (३) च्या तरतुदीनुसार, एकूण सदस्य संख्येच्या एक तृतीयांश सदस्य सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे. आणि एकूण पालक सदस्य संख्येच्या पन्नास टक्के पालक सदस्य उपस्थिती आवश्यक आहे. सभापूर्तीसाठी आवश्यक असलेली किमान गणसंख्येची पूर्ती न झाल्यास समितीचे अध्यक्ष अर्ध्या तासांसाठी बैठक स्थगित करतील. किमान गणसंख्या नसल्यास, कोणताही विषय सभेत हाताळला जाणार नाही. प्रस्तुत नियमामध्ये नमूद केल्याप्रमाणे सभा रद्द केली जाईल आणि पंधरा दिवसांनी सभा परत बोलवली जाईल.

आपल्या संदर्भासाठी विषयपत्रिका जोडली आहे.

पूर्ण वर्षभर आपले सहकार्य लाभावे ही अपेक्षा!

आपली नम्र,
सौ.अबिरा मिश्रा
प्राचार्य
पी.आय.सी.टी मॉडेल स्कूल

पी.आय.सी.टी मॉडेल स्कूल

(सी.बी.एस.ई मान्यता क्रमांक:- ११३०८३५)

म्हाळुंगे–बालेवाडी, पुणे

पी.आय.सी.टी मॉडेल स्कूलच्या पालक - शिक्षक संघटनेची

पहिली कार्यकारी समिती बैठक

२०२६-२०२७

शनिवार दिनांक २५ एप्रिल, २०२६

१. कार्यकारी समितीच्या सदस्यांचे स्वागत करणे.

२. कार्यकारी समितीच्या सदस्यांची ओळख.

३. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (फी नियमन) कायदा, २०११ आणि त्याखाली तयार केलेले नियम वाचणे.

४. कार्यकारी समितीची रचना.

५. पी.आय.सी.टी. मॉडेल स्कूलच्या पी.टी.ए बैठकीची सरकारी नियमावलीनुसार कार्यकारी समिती स्थापना.

६. २०२५-२०२६ च्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कामकाजावरील स्थिती अहवाल.

७. येत्या वर्षातील शैक्षणिक प्रशासकीय बदल.

८. आभार.